ISSN 2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC





# POWER OF KNOWLEDGE


An International Multilingual Quarterly Refereed Research Journal
UGC Approved

Special Issue - September 2017

म.शि.प्र.मंडळाचे

## सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव आयोजित

## आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचा विशेषांक




बोडके बी.आर.
(संपादक)

डॉ.व्ही.पी.पवार
(प्राचार्य)

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | हुंडाबळी विषयी प्रशासनाची भूमिका | डॉ. जिजाबाई कांगण | १६५ |
| ५३ | हुंडा बंदी कायदा - ऐतिहासिक अभ्यास | प्रा.डॉ.फसले जी.पी. | १६९ |
| ५४ | आदिवासींची हुंडा पध्दत : स्त्री जातीचा सन्मान | डॉ. भास्कर गायकवाड | १७४ |
| ५५ | हुंडाप्रथा : स्वरूप आणि मराठी साहित्यातील चित्रण | प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | १७७ |
| ५६ | नैतिक बदलाशिवाय हुंडाबंदी अशक्य | प्रा. सोमनाथ गुंजकर | १८२ |
| ५७ | हुंडा एक समस्या | प्रा. हंगरगेकर व्हि. एन. | १८४ |
| ५८ | हुंडाप्रथा : ऐतिहासिक पार्श्वभूमी | श्री. होगे राधाकिशन आंबादासराव | १८७ |
| ५९ | हुंडा प्रथा : कारणे, वास्तव, परिणाम व उपाय | प्रा.दिलीप रामचंद्र जाधव | १९० |
| ६० | हुंडा कुप्रथेवरील कायदेशिर उपाययोजना : एक अभ्यास | प्रा. डॉ. कळसकर एस.एन. | १९४ |
| ६१ | हुंडा : सामाजिक समस्या व उपाय | प्रा. घाटुळ महादेव सोपानराव | १९८ |
| ६२ | हुंडा एक सामाजिक समस्या | प्रा. सचिन प्र. कोठेकर | २०१ |
| ६३ | हुंडा पध्दती एक सामाजिक समस्या | कोकाटे पुष्पलता नामदेव | २०३ |
| ६४ | हुंडाप्रथा : भारतीय समाजव्यवस्थेला लागलेली भयंकर कीड कारणे, परिणाम व उपाय | प्रा.मोगल अनंत,<br>डॉ.शाम पवार | २०५ |
| ६५ | 'चिखलवाट': हुंडा समस्येचे चित्रण करणारी मराठी ग्रामीण कादंबरी' | प्रा.मोरे संगीता दत्ताजी | २०८ |
| ६६ | हुंडा एक सामाजिक समस्या व उपाय | प्रा.डॉ.गितांजली मोटे | २११ |
| ६७ | हुंडा : सामाजिक समस्या व उपाय | पाटील बसवराज,<br>बोकडे भगवंत चंद्रकांत | २१६ |
| ६८ | हुंडा प्रथा - कारणे - परिणाम - उपाय | प्रा. पाटील एस. एन. | २२० |
| ६९ | हुंडा प्रथा एक सामाजिक कलंकब | मा. विलास सोमाजी पवार | २२३ |
| ७० | हुंडा एक सामाजिक समस्या | मोकासरे गणेश तुकाराम | २२५ |
| ७१ | हुंडाबळी एक समस्या : कारणे व उपाय | कांबळे शरद पुंडलिक | २२८ |
| ७२ | हुंडाप्रथा : कारणे व उपाय | राठोड ज्ञानेश्वर गणपतराव | २३२ |
| ७३ | हुंडा : सामाजिक समस्या व उपाय | प्रा. ईश्वर एल. राठोड | २३४ |
| ७४ | हुंडा प्रथा : एक सामाजिक अभिशाप | प्रा. डॉ. आनंद शिंदे | २३८ |
| ७५ | हुंडाप्रथा : कारणे, वास्तव, परिणाम व उपाय | प्रा. सोळंके दत्ता सोपानराव | २४३ |
| ७६ | हुंडा प्रथा एक ज्वलंत सामाजिक समस्या | डॉ.जयदीप रा. सोळुंके | २४७ |
| ७७ | " हुंडा पध्दत सामाजिक समस्या " एक चिकित्सक अभ्यास | डॉ.सोनवणे श्रीराम विक्रमराव,<br>प्रा. बादाडे रविंद्रकुमार सुदामराव | २५१ |
| ७८ | हुंडा प्रथेचे साहित्यातील चित्रण | पा. सुर्यवंशी दीपक सुभाषराव | २५४ |


Scanned with OKEN Scanner

Power of Knowledge UGC Approved Journal Volume : I Special Issue, Sept.2017 ISSN 2320-...

# हुंडा : सामाजिक समस्या व उपाय

प्रा. ईश्वर एल. राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

१९७५ नंतरच्या वर्षामध्ये महिला आंदोलन पुन्हा जोमदारपणे उभे राहात असताना 'हुंडा' विशेषत: 'हुंडाबळी' हा प्रश्न ऐरणीवर आणला गेला. नवरा आणि सासरच्यांनी पैशंची आणि चैनीच्या वस्तूंची हाव न संपणारी आहे. त्यामुळे पत्नी, सुनेला पेटवण्यापर्यंत, जीवे मारण्यापर्यंतही त्यांची मजल जाऊ शकते. हा प्रश्न धसाला लावण्याचे प्रखर प्रयत्न झाले. तथापि आज हुंड्याची प्रथा अबाधित आहे. एवढंच नव्हे तर तिची पाळेमुळे एखाद्या विषवेलीसारखी अधिक घट्ट आणि अधिक विस्तृत झालेली दिसत आहेत.

**हुंडा संकल्पनाः**

**मॅक्स रॅडिनच्या मते :**

"विवाहाच्या वेळी पुरुषाला त्यांची पत्नी किंवा कुटुंबाकडून मिळणारी संपत्ती म्हणजे हुंडा होय."

**चार्ल्स विनिकचे मते :**

"विवाहात समाविष्ट होणाऱ्या दोन पक्षापैकी एक पक्ष दुसऱ्या पक्षाला विवाहासाठी ज्या मौल्यवान वस्तू देतात, त्यास हुंडा असे म्हणतात."

**१९६१ चा हुंडाविरोधी कायदा :**

"हुंडा विरोधी कायद्यात कोणत्याही एका पक्षाने दुसऱ्या पक्षास प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे दिलेली संपत्ती असा शब्द प्रयोग केलेला असला तरी भारतीय समाजात वर पक्षाने वधू पक्षाला मागीतलेली संपत्ती असेच त्याचे स्वरुप असते. स्त्री धनावर त्या स्त्रियाची पुर्ण मालकी असते. भेट ही स्वखुशीने नातेवाईक मित्र देतात. परंतु हुंडा हा करारातून मिळालेला असतो आणि त्यावर वर किंवा वरपित्याची मालकी असते.

**हुंडा प्रथेच्या विस्तारणाऱ्या कक्षा :**

भारतातील विविध धर्मांच्या अनुयायांमध्ये हुंडा पध्दतीचे प्रचलन आहे. भारतात भौतिकवादी विचारांचा, तत्वज्ञानाचा आणि जीवनपध्दतीचा जसजसा प्रसार होत गेला तसतसे हुंडा पध्दतीचे स्वरुप अधिक मोठे झाले आणि अधिक घातक झाले. भारतात हुंडा पध्दतीचे अस्तित्व प्राचीन काळापासून आहे. धर्मग्रंथांच्या देवदेवतांच्या विवाह वर्णनात वधूपित्याने वधूसोबत दिलेल्या मौल्यवान भेटवस्तूंचा उल्लेख आलेला आहे. मध्ययुगापर्यंत हुंडा पध्दतीला विवाहसंबंधासाठीचा आवश्यक घटक असे स्वरुप प्राप्त झाले. परंतू नतंरच्या काळात हुंडा या प्रथेचे स्वरुप खुपच बदलून गेले आणि या विघातक प्रथेमुळे समाजातील हुंडा बळी संख्या ही वाढतच गेली आहे.

**हुंडा प्रथेचे बदलते रुप :** पूर्वी हुंड्याची प्रथा सवर्ण हिंदूमध्येच प्रचलित होती. त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेची बाब होती. सत्तरीच्या दशकापर्यंत मात्र ही प्रथा ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदूमधील मध्यम जातींमध्येही रुजली होती. आज तर या समुदायांतील निम्न जातींमध्येही हुंडा प्रथेने पाय रोवल्याचे दिसून येते. ज्या जमाती, आदिवासी यांमध्ये पूर्वी 'कन्या शुल्क' म्हणजे साध्या भाषेत 'मुलीला हुंडा' देण्याची प्रथा होती, तिथेही आता या पूर्वीच प्रथा बदलून मुलीबरोबर हुंडा देण्याची प्रथा सुरु झाली आहे. पूर्वीची हुंडा प्रथा व आजची हुंडा प्रथा यातील फरक पुढीलप्रमाणे नोंदवता येतील..

**१) पूर्वी दोन्ही बाजूने देवघेव :** आजच्या परिस्थितीत हुंडा हे एकाच बाजूने घेतल्या जाते. पूर्वी विवाहप्रसंगी वर-वधू या दोन्ही बाजू परस्परांना भेटी, आहेर द्यायचे . विवाहात सामील झालेले लोक, दोन्हीकडचे कुंटुंबीय यांना आज मात्र आहेरांचे



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

आदान-प्रदान होत नाही, तर वधूपक्षाकडूनच अधिकतर आहेर केले जातात व खर्चाचा सर्व भारही उचलला जातो.

**२) हुंडा केवळ लग्नापुरता मर्यादित राहिलेला नाही :** आज हुंड्याचा परीपही प्रचंड विस्तारला आहे. केवळ विवाहाच्या वेळीच देणे-घेणे होत नाही. तर वधूवरांची पत्रिका जमली की तिथपासून सुरुवात होते. मुलीच्या साखरपुड्यापासून ते बाळ जन्मल्यानंतर होणाऱ्या सर्व विधी साठी वर पक्षाकडील लोकांचे मानपान केली जाते. या सर्व कार्याला वधू पित्यांनीच खर्च करावा लागतो. म्हणून हा देखील प्रत्यक्ष स्वरुपात हुंडाच आहे असे म्हणावे लागेल. लग्नानंतर देखील वधू पिता आपल्या लेकीला सतत हातभार लावत असतो आणि वर पक्षातील लोकांना याची अपेक्षा देखील मोठया प्रमाणात असते.

**३) विवाह विधीला अवास्तव महत्व :** हिंदू व अन्य धर्मामध्येही जे अनेकविध संस्कार व विधी महत्वाचे मानले जातात, त्यापैकी विवाह विधी हा एक होता. पण आज तोच सर्वांत महत्वाचा विधी झाला आहे आणि त्याची प्रतिष्ठा हुंड्याच्या किंमतीवरुन तोलली, जोखली जाते.

**४) विवाहात हुंड्याला निर्णायक स्थान :** वधूपक्षाची खर्चाची तयारी, क्षमता हा विवाह जुळवण्याचा मध्यवर्ती मुद्दा बनला आहे. आज सर्वत्र लग्नाची बोलणी होतातही अतिशय सूचक पध्दतीने. हुंडा ही आता लग्नातही भेट वा वरदक्षिणा राहिली नसून विवाह जुळून यावा यासाठी द्यायचे प्रलोभन बनले आहे.

**५) नवनविन मागण्यांवरील वाढता खर्च :** मुलीकडच्यांची खर्चाची क्षमता हाच एकमेव घटक नाही. तर ते तो खर्च कशा वैविध्यपूर्ण रीतीने व कल्पकतेने खर्च करतात. यालाही महत्व आले आहे. विवाह पार पाडत असताना वर पक्षाला वधू पक्षाकडून नाविण्यपुर्ण लग्न सोहळा लावून देण्याची फार मोठी अपेक्षा आहे. या मध्ये वधू पित्याला भरपूर खर्च येत असतो. हा सुध्दा हुंडयाचाच एक भाग आहे.

**हुंडा पध्दतीच्या वाढत्या प्रचलनाची कारणे :**

**१) परंपरा :**

प्राचीन काळापासून हुंडा पध्दतीचे प्रचलन भारतात आहे. आधुनिक काळापर्यंत नागरीकरणाचे प्रमाण फारसे नसल्याने भारतातील ग्रामीण समुदायात हुंडा पध्दतीचे प्रचलन मोठया प्रमाणात होते. हुंडा पध्दतीची परंपरा निर्माण झाल्याने पिढयान् पिढया हुंडा पध्दतीचे प्रचलन सुरु झाले. आधुनिक काळात हुंडा ही विवाहाची आवश्यक अट बनली आहे. चालत आलेली परंपरा हुंडा पध्दतीच्या वाढत्या प्रचलनासाठी जबाबदार आहे.

**२) अंतर्विवाहाचा नियम :**

जात हा अंतर्विवाह गट आहे. त्यामुळे स्वजातीतच किंबहुना पोटजातीतच विवाह करण्याची सक्ती असते. जातीअंतंत विवाहाच्या कठोर नियमामुळे हुंडा पध्दतीला चालना मिळाली. स्वजातीतील श्रीमंत, नामांकित, उच्चकुलीन मुलावरोबर विवाहसंबंध प्रस्थापित करण्यासाठी वधूपिता मागेल ती किंमत मोजायला तयार असतात. परिणामी हुंडा पध्दतीला अधिक बळ मिळते.

**३) ठरविलेले विवाह :**

भारतीय समाजात आजही ठरविलेल्या विवाहाचे अधिक्य आहे. विवाहात वर वधूची निवड माता-पिता व नातेवाईक करतात. औपचारिकता म्हणून वर-वधूची संमती घेतली जाते. विवाह ठरवित असतांना जेष्ठ मंडळी अनेक निर्णय घेतात. त्यात हुंडयाचा समावेश असतो. हुंडा आला पुढील बोलणीला वेग येत असते. विवाह निश्चितीच्या अशा परंपरावादी स्वरुपामुळे हुंडाप्रथा कायम होण्यास मदत झाली आहे.

**४) सामाजिक प्रतिष्ठेची भ्रामक धारणा :**

वास्तविक पाहता हुंडा देणे आणि घेणे अयोग्य आहे. हा व्यवहार गुप्तपणे चालतो. परंतु आपसात त्याची वाच्यता करतात, त्यातुन त्यांना आपली प्रतिष्ठा सिध्द करावयाची असते. देणारा आणि घेणारा प्रतिष्ठा वाढावी, लोकांमध्ये आर्थिक सुबतेचा दबदबा वाढावा आणि इतरांचे तुलनेत आपण किती श्रीमंत व प्रतिष्ठित आहोत, हे दर्शविण्यासाठी या प्रक्रियेत सहभागी होतात. म्हणजेच हुंडा देणे आणि घेण्याला योग्य मानतात.



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

**५) जातीतील संस्तरण :**

जाती व्यवस्थे अंतर्गत स्तर असतात. हे स्तर भुमिवरची मालकी, व्यवसायातील उत्पन्न, त्याचबरोबर खानदानीपणा यावर आधारलेले असतात. समाजात आपल्या मुलीचा विवाह वरच्या स्तरात व्हावा, अशी अपेक्षा असते. त्यासाठी वरच्या स्तरातील वराची निवड करण्यासाठी जास्त हुंडा द्यावा लागतो. अशा स्वरुपाचे ही विवाह होतं असतात.

**६) आधुनिक शिक्षण :**

शिक्षणाने ज्ञानाच्या कक्षा वाढतात. व्यक्तिमत्वाचा विकास होतो. विज्ञाननिष्ठ विचारसरणी अंतरीकृत केली जाते. नवीन क्षेत्रात व्यवसाय करता येतात. नोकऱ्या मिळतात. स्पर्धापरीक्षेच्या माध्यमातून वरची सत्तापदे मिळतात. हया प्रकार्यात्मक बाजूबरोबरच हे सर्व ज्ञात आहे की, शिक्षणाने हुंडयाचा प्रश्न संपण्याऐवजी आणखीच जटिल बनला आहे.

**एम. एन. श्रीनिवास यांचे मते,**

शिक्षणाने हुंडयाचे संकट दूर होण्याऐवजी आणखी वाढले आहे. डॉक्टर, इंजिनिअर, शासकीय सेवेतील उच्चपदस्थ यांचा भाव सर्वात जास्त आहे. सर्वसाधारण नोकरी करणारे हुंडयाच्या बाजार आपला भाव कमी करण्यास तयार नसतात. थोडक्यात, उच्च शिक्षण जास्त हुंडा असे समिकरण रुढ झाले आहे. हुंडा या समस्येला कारणीभूत असलेली कारणे खुप मोठया प्रमाणात वाढलेली आहेत. पारंपारिक ते आजच्या आधुनिक समाजात हुंडा ही संकल्पना जशीच्या तशीच आहे. परंतु आज या समस्येनी उग्र रुप धारण केले आहे. आर्थिक संपन्ता प्राप्त करुन घेण्यासाठी, लोभी प्रवृत्ती असणारी माणसे, मुलीची कुरुपता आणि विवाहास उशीर अशी अनेक कारणे हुंडा या प्रथेला जबाबदार आहेत.

**हुंडा प्रथेची दुष्परिणाम :**

**१) हुंडाबळी :**

भारतीय समाजात वरपक्षाच्या कुटुंबाची त्यामुळे विवाहाच्या उंबरठयावर असणाऱ्या मुलींवर व त्यांच्या कुटुंबीयांवर एक प्रकारची दहशत पसरली आहे. हुंडा प्राप्तीची लालसा एवढी पराकोटीला पोहोचली आहे की, जर वरपक्षास अपेक्षित हुंडा प्राप्तीची लालसा एवढी पराकोटीला पोहोचली आहे की, जर वरपक्षास अपेक्षित हुंडा मिळाला नसेल तर वधूला जिवंतपणी जाळून ठार केले जाते. यालाच हुंडाबळी म्हणतात. दिवसेंदिवस या हुंडाबळीचे प्रमाण वाढत चालले आहे. भारतात हुंडाबळीमुळे मृत्यूमुखी पडणाऱ्या स्त्रियांबद्दल एक भयानक वास्तव समोर आले आहे, दर तासाला सरासरी एक स्त्री हुंडा प्रथेची वळी ठरत आहे. २०१२ -१३ मध्ये ८२३३ आणि २०१६ नंतर या संख्येत प्रामुख्याने फार मोठी भर पडली आहे. साधारणपणे २४७७१ इतके स्त्रियांच्या मृत्यू हुंडयाच्या कारणामुळे झाल्याचे स्पष्ट दिसून येते.

**२) नवविवाहितेचा छळ :**

भारतीय ग्रामीण समाजात हुंडा ही विवाहाची अनिवार्य अट बनलेली आहे. हुंडा पध्दतीमुळे वरपक्षाकडील कुटुंबीयांचा संपत्तीविषयक हव्यास वाढत जातो. हुंडयाची अट पुर्ण झालेली नसेल तर अधिक हव्यासापोठी नवविवाहितेचा शारीरिक, मानसिक छळ केला जातो. माहेरहून मौल्यवान वस्तू आणि विविध कारणांसाठी पैसे आणण्यासाठी हा छळ होतो. काही प्रकरणात या छळाचा शेवट विवाहितेच्या आत्महत्येत. खुनात किंवा घटस्फोटात होतो.

**३) मुलीच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम :**

मुलीच्या शिक्षणावर खर्च करण्यापेक्षा हुंडा जमा करण्यावर भर दिला जातो. हुंड्याच्या भीतीपोटी मुलीचा बालविवाह करण्याकडे कल दिसून येतो. मुलीचे वय जास्त झाल्यास विवाहास अडचणी येतील यासाठी लवकर विवाहबंधनात अडकवण्याची घाई होते. यामुळे मुलीच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होतो. अनेकदा शिक्षण अर्धवट सोडावे लागते.

**४) वधूपित्याचा कर्जबाजारीपणा :**

हुंडा पध्दतीचा अनिष्ट परिणाम वधूच्या कुटुंबीयांवर होतो. भरमसाट हुंडा देण्याची ऐपत अनेकदा वधूपित्याची नसते. प्रसंगी कर्ज काढून हुंड्याची पूर्तता केली जाते. कुटुंबात मुलींची संख्या जास्त असेल तर वधूपित्याचा कर्जबाजारीपणा



Scanned with OKEN Scanner

संपता संपत नाही. आर्थिक विवंचना आणि कर्जबाजारीपणा यामुळे वधूपित्याचे कुटुंब अक्षरश: मेटाकुटीला आल्याचे अनेक घटनेवरुन लक्षात येते.

**५) स्त्री- भ्रूणहत्या :**

वर्तमान परिस्थितीत स्त्री-भ्रूणहत्येचे अनेक प्रकार उघडकीस आलेले आहेत. स्त्री- भ्रूणहत्येच्या पाठीमागची कारणमीमांसा लक्षात घेतल्यास ज्या कुटुंबात मुलींची संख्या जास्त आहे अशा कुटुंबीयांकडून स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे हुंडा पध्दती स्त्री-भ्रूणहत्येस जबाबदार आहे. भारताच्या ग्रामीण आणि निम्न शहरी भागात असे प्रकार जास्त घडतात.

**हुंडा पध्दतीचे दुष्परिणाम** पाहता सद्यकालीन परिस्थितीत ही समस्या वाढत चाललेली दिसून येते. आज सर्वच स्तरातील वर पक्षाकडून हुंड्याची मागणी मोठया प्रमाणात होत असलेले दिसून येते. जेव्हा विवाह संस्कार पार पाडल्या जाते तेव्हा जर वर पक्षाची मागणी पुर्ण झाली नाही तर मात्र काही काळानंतर त्या कुटुंबातील सदस्याकडून त्या वधूला त्रास देण्यास सुरुवात होते. वधू पित्याकडून जर हुंड्याची मागणी पूर्ण झाली नाही तर वधूला त्रास देऊन मारणे, जाळणे रॉकेल अंगावर टाकणे, आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे, माघारी आई-वडीलांच्या घरी पाठविणे, घटस्फोट घडवून आणणे, तिच्या स्त्रीपणाच्या अस्तित्वाला काळीमा लावणे, ती स्वत: राहत असलेल्या समाजातील तीचे अस्तित्व नष्ट करणे, अशा प्रकारे पारंपारिक ते आजच्या आधुनिक स्त्री ची समाजातील स्थिती दिसून येते. हुंडा प्रथा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे. तसेच समाजात लिंगभेदाची भावना वाढविण्यास जबाबदार असल्याचे दिसून येते.

**हुंडा समस्या निर्मूलनाचे उपाय :**

१) योग्य स्थळाची निवड करणे गरजेचे आहे. जर वधू-वर कुटुंबामध्ये समतोलत्व असेल तर समस्या निर्माण होत नाही.
२) हुंडा प्रथेविरुध्द समाजातील सर्व घटकांनी एकजुटीने सामाजिक दबाव निर्माण करणे आवश्यक आहे.
३) हुंडा देणे आणि घेणे ही अत्यंत वाईट व घातक स्वरुपाची बा आहे तसेच कायद्यानुसार गुन्हा आहे याविषयी समाजातील जनमत जागृत केली पाहिजे.
४) आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले तर त्यातून हुंड्याला आळा बसेल.
५) स्त्रिशिक्षण व आर्थिक स्वावलंबनाला महत्व देवून स्त्रियांना बंधनातून मुक्त करणे गरजेचे आहे. त्यामुळे हुंडा प्रथेची समस्या सोडविता येऊ शकेल.

**६) कायदेशिर उपाय :** भारत सरकारने या समस्येच्या उन्मलनासाठी १९६१ साली हुंडा प्रतिबंधक कायदा पास केला. हा कायदा १९८४ साली हुंडा प्रतिबंधक कायदा पास केला. या कायद्याप्रमाणे हुंडा देण्याबद्दल आणि घेण्याबद्दल प्रोत्साहन देणाऱ्यास ५ वर्षे कैद आणि १५००० रु. दंड इतकी किमान शिक्षा करण्यात येईल, अशी तरतूद समाविष्ट आहे. महाराष्ट्र शासनाने १९८७ सालापासून हुंडाग्रस्त महिलांसाठी माहेर नावाची योजना सुरु केली. आज संपुर्ण महाराष्ट्र नव्हे तर वेगवेगळया राज्यात देखील हुंडा प्रथेच्या प्रचलनामुळे वेगवगळया भागातील शेतकरी आत्महत्या करीत असताना दिसून येते. कारण की दुष्काळ आणि त्यातही मुलींचा विवाह करावयाचे असेल तर ती व्यक्ती आर्थिक अडचणीत असल्यामुळे आत्महत्या करण्यास प्रवृत होते.

**संदर्भ :**

१. रजनी पालरीवाला, हुंडाप्रथेच्या विस्तारणाऱ्या कक्षा :एक दृष्टिक्षेप, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना.
२. खडसे भा. कि., (२००४), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिशिंग हाऊस, गिरगाव, मुंबई.
३. गोरे अशोक, (२०१५), भारतीय सामाजिक समस्या, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद,
४. मोरे जी. एन., (२०१४), ग्रामीण समस्या आणि नागरी प्रश्न, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद.
५. www.google.search engine....



Scanned with OKEN Scanner